महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,मुंबई ४०० ०१९
email : agmhrom@gmail.com
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
website :www.mahadiscom.in
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

**क्र. मासंवि/रवका/न.क्र.९/२५८८६** **दिनांक : १६.०९.२०१९**

प्रति,
सर्व मुख्य अभियंता,
म.रा.वि.वि.कं.मर्या.
परिमंडळ कार्यालय.

**विषय: महावितरण कंपनी अंतर्गत कार्यरत विद्युत अभियांत्रिकी पदवी / पदविका (Degree/Diploma) धारण केलेल्या तांत्रिक कर्मचाऱ्यांना कनिष्ठ अभियंता/सहाय्यक अभियंता या पदाचा अतिरिक्त कार्यभार सुपूर्द करणेबाबत.**

पुर्वीचे विज मंडळ व तदनंतर महावितरण कंपनीतील कर्मचारी यांच्याकरिता कनिष्ठ अभियंता व सहाय्यक अभियंता ही पदे सरळ सेवेने तसेच पदोन्नतीने भरतांना महावितरण कंपनी अंतर्गत कार्यरत विद्युत अभियांत्रिकी पदवी / पदविका (Degree/Diploma) धारण केलेल्या तांत्रिक कर्मचाऱ्यांना सद्यस्थितीत ५% कनिष्ठ अभियंता या पदासाठी व ५% सहाय्यक अभियंता या पदासाठी सरळ सेवेने भरतीचे प्रमाण राखून ठेवण्यात आलेले आहे.

२. महावितरण कंपनी अंतर्गत कार्यरत असलेल्या तांत्रिक कर्मचारी, ज्यांनी विद्युत अभियांत्रिकी पदवी / पदविका (Degree/Diploma) ही शैक्षणिक पात्रता धारण केली आहे अशा तांत्रिक कर्मचाऱ्यांना कनिष्ठ अभियंता या पदाच्या रिक्त पदी अतिरिक्त कार्यभार सुपूर्द करणे ही बाब कंपनीच्या विचाराधीन होती.

३. परिमंडळ कार्यालयाच्या कार्यक्षेत्रांर्तगत येणाऱ्या ज्या कर्मचाऱ्यांनी विद्युत अभियांत्रिकी पदवी / पदविका (Degree/Diploma) ही शैक्षणिक पात्रता धारण केली आहे अशा **पात्र व सक्षम** तांत्रिक कर्मचारी यांना **कनिष्ठ अभियंता या पदाच्या रिक्त पदी गरजे नुसार अतिरिक्त कार्यभार सुपूर्द करणे** बाबतची कार्यवाही आपल्या स्तरावरुन एक विशेष बाब म्हणून करण्यात यावी. सदर कर्मचाऱ्यांना मराविविकंम, कर्मचारी सेवाविनियम - २००५ च्या सेवाविनियम क्र. ३६ मधील तरतुदी नुसार सदरच्या पदाचा किमान वेतनाच्या १/१०% इतक्या दराने विशेष वेतन देण्यात यावे.

४. तांत्रिक कर्मचारी यांना शाखा / कक्ष कार्यालयांतील कनिष्ठ अभियंता यांच्या रिक्त पदाचा अतिरीक्त कार्यभार खालील निकषांच्या अधिन राहून गरजे नुसार सुपूर्द करण्यात यावा.

(क). तांत्रिक कर्मचारी हा किमान यंत्रचालक किंवा प्रधान तंत्रज्ञ या संवर्गामधील असावा आणि सदर पदामध्ये एकुण ५ वर्ष सेवा झालेली असावी.

(ख). अतिरिक्त कार्यभार सुपूर्द केलेल्या तांत्रिक कर्मचारी यांच्यावर परिमंडल कार्यालयातील कार्यकारी अभियंता यांचे नियंत्रण राहील. **अतिरिक्त कार्यभाराच्या कालावधीत कर्मचाऱ्याने वरिष्ठांच्या सल्ल्यानुसार प्रशासकीय कामे पार पाडावीत.**

(ग). पात्र तांत्रिक कर्मचारी यांना कनिष्ठ अभियंता या पदावर यशस्वीपणे काम करण्यासाठी कार्यालयीन दैनंदिन कार्यालयीन कामकाजाबाबतचे आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.

(घ). अतिरिक्त कार्यभार सुपूर्द केलेल्या तांत्रिक कर्मचारी यांना रिक्त पदी अतिरिक्त कार्यभार सुपूर्द केल्याने कनिष्ठ अभियंता/सहाय्यक अभियंता या पदाच्या रिक्त पदी समायोजनाचा कोणताही हक्क असणार नाही.

(च). कंपनीच्या कामाच्या निकडीनुसार देण्यात आलेला अतिरिक्त कार्यभार सक्षम अधिकारी कोणतीही पुर्वसुचना व कारण न देता केंव्हा ही संपुष्टात आणण्यास सक्षम राहतील.

(छ). शाखा / कक्ष कार्यालयातील कनिष्ठ अभियंता यांच्या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी हा ६ महिन्यापेक्षा अधिक राहणार नाही.

(ज). सक्षम अधिकाऱ्याने प्रयोगिक तत्वावर देण्यात आलेला शाखा / कक्ष कार्यालयातील अतिरिक्त कार्यभाराची दर ३ महिन्याने कर्तव्य व गुणवत्ता तपासणी करावी व तसा अहवाल संबंधीत मुख्य अभियंता यांना सादर करावा.

(झ). वरील बाबीस प्रायोगीक तत्वावर एक वर्षाकरीता मंजुरी देण्यात येत आहे.

५. सबब, आपणास विनंती करण्यात येते की, सदर बाबतींत परिमंडळ स्तरावरून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

**(कमांडर शिवाजी इंदलकर) (से.नि.)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत माहितीसाठी सविनय सादर:-**

१. सहा. व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद/ कल्याण.
२. प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय, पुणे / नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:-**

१. मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु), म.रा.वि.वि.कं.मर्या. एकलहरे, नाशिक.
२. मुख्य महाव्यवस्थापक (तां.आ.), म.रा.वि.वि.कं.मर्या. सांघिक कार्यालय, मुंबई.
३. मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या. सांघिक कार्यालय, मुंबई.